Copy

Kind Attention Hon. Chorge Minister
Government GR
Tobacco manufacturers
Sponsership under CSR
not allowed

सिगारेट व तंबाखुजन्य उत्पादक कंपन्या किंवा त्यांचे प्रायोजकत्व घेणाऱ्या कंपन्या/संस्थांमार्फत आयोजीत केलेल्या कार्यक्रमात शासकीय कार्यालयांनी तसेच शासनाच्या अधिपत्याखालील संस्थांनी सहभागी न होणेबाबत.

Page 295

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः तंनिका-२०१७/प्र.क्र.२०८/आ-५,
८ व १० मजला, संकुल इमारत, नविन मंत्रालय,
जी.टी.रुग्णालय आवार, मुंबई- ४०० ००१.
तारीख: ४ ऑक्टोबर, २०१७

Mr. Survase
Ms. Lokh

**संदर्भ :**

१) सिगारेट व अन्य तंबाखुजन्य उत्पादने (जाहिरात, प्रतिबंध व व्यापार, वाणिज्य, उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियम) कायदा, २००३.

२) सहसंचालक, आरोग्य सेवा (असंसर्गजन्य रोग), मुंबई यांचे जा. क्र. संआसे/NCD/माआ/तंनिका/४५५/२०१७, दि १६/०६/२१७ रोजीचे पत्र.

**परिपत्रक :**

"सिगारेट व अन्य तंबाखुजन्य उत्पादने (जाहीरात, प्रतिबंध व व्यापार, वाणिज्य, उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियम) कायदा (COTPA), २००३" च्या कलम ५ नुसार सिगारेट किंवा तंबाखुजन्य उत्पादने यांची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष जाहीरात करण्यास बंदी आहे. उक्त कलम ५ च्या पोट कलम ५.३ नुसार सिगारेट किंवा व अन्य तंबाखूजन्य उत्पदनांची जाहिरात होईल किंवा तंबाखुजन्य उत्पादनांच्या सेवनास प्रोत्साहन मिळले या दृष्टीने देऊ केलेली शिष्यवृत्ती, बक्षीसे, भेटवस्तू किंवा एखाद्या कार्यक्रमाचे प्रायोजकत्व (Sponsorship) घेण्यास प्रतिबंध घालण्यात आला आहे. यास्तव, "सिगारेट व अन्य तंबाखुजन्य उत्पादने कायदा (COTPA),२००३" च्या कलम ५.३ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यातील सर्व शासकीय विभाग आणि त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांनी/ संस्थांनी सिगारेट व तंबाखुजन्य उत्पादन करणाऱ्या कंपन्यांनी आयोजीत केलेल्या कार्यक्रमात सहभागी होऊ नये. तसेच सिगारेट व तंबाखुजन्य उत्पादन करणाऱ्या कंपन्यांनी /प्रायोजक कंपन्या/संस्थांनी देऊ केलेल्या शिष्यवृत्ती, बक्षीसे किंवा भेटवस्तु स्विकारु नयेत.

२ सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१७१००४१६४१५९०५१७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sharad B. Londhe

Digitally signed by Sharad B. Londhe
DN: CN = Sharad B. Londhe, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2017.10.05 15:17:53 +05'30'

( श. बा. लोंढे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.